# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.04.2025** **वार- रविवार**

---

**आंबेडकर**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त पुणे स्थानक परिसरातील डॉक्टर आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ उद्या सकाळी दहा वाजता सर्वपक्षीय आणि सर्वसमावेशी संयुक्त अभिवादन सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. भीमजयंती मध्यवर्ती समितीनं कार्यक्रम आयोजित केला आहे.

**वाहातूक**

दरम्यान, आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभुमीवर पुणे रेल्वे स्थान परिसरातील जिल्हाधिकारी कार्यालय, अरोरा टॉवर, विश्रांतवाडी आणि दांडेकर पूल परिसरातल्या वाहातुकीत बदल करण्यात आला आहे. या परिसरात अवजड वाहनांना बंदी घालण्यात आल्याची माहिती वाहातूक विभागानं दिली आहे.

**पुणेटँकर**

वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभुमीवर पुणे शहरात पाण्याच्या टँकरची वाढती मागणी लक्षात घेता, टँकरवर देखरेख ठेवण्यासाठी टँकरच्या फेऱ्यांच्या नोंदपुस्तकात संबंधित विभागातील सहायक आयुक्तांची स्वाक्षरी घेणे पालिकेकडून बंधनकारक करण्यात आलं आहे. अनेक भागांत मागणी नोंदवूनही टँकर पोहोचतच नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत असल्यानं हा निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>नालेसफाई</u>**

पावसाळ्यापुर्वी करण्यात येणाऱ्या नालेसफाईसाठी आवश्यक निAविदा प्रक्रिया उशीरा सुरू झाल्यानं, वेळेत हे काम पूर्ण करण्याचे मोठे आव्हान पुणे महापालिकेसमोर आहे. पालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नालेसफाई आणि ड्रेनेज सफाईसाठी प्रत्येकी एक, अशा ३० निविदा काढण्यात आल्या आहेत. पालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये पावसाळी वाहिन्या नसल्याने या गावांमधील नालेसफाईसाठी महापालिकेकडून आठ निविदा काढण्यात आल्या असल्याची माहिती महापालिकेतील अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**<u>आएमएखोट्यातक्रारी</u>**

पुणे शहरातल्या खासगी रुग्णालयांच्या विरोधातल्या वाढत्या तक्रारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळांकडे खोट्या तक्रारी दाखल होत आहेत. या प्रकरणी इंडियन मेडिकल असोसिएशन आणि हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडियाने या संदर्भात मंडळाला पत्र लिहून खोट्या तक्रारदारांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पुणे शाखेनं केली आहे. सर्व नियमांचे पालन करूनही रुग्णालयाविरोधात तक्रारी करून त्रास दिला जात असल्याचं पत्रात म्हटले आहे.

**<u>उत्कृष्टग्रंथनिर्मिती</u>**

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली. या वर्षी ९६ प्रकाशकांच्या ६३० पुस्तकांमधून ही निवड कर्ण्यात आली आहे. यामध्ये विविध विभागात पुण्यातल्या प्रकाशनांच्या साहित्याला पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

**<u>संवादिनीसंकल्प</u>**

पुण्यातल्या गांधर्व महाविद्यालयाचे प्राचार्य आणि संवादिनी वादक पंडित प्रमोद मराठे यांच्या संकल्पनेतून 'रामनवमी सराव' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुढीपाडवा ते हनुमान जयंती या कालावधीत गुरुंसह शिष्यांनी १००८ तास संवादिनी सराव वादन संकल्पाची पूर्ति केली. चौदा दिवसांच्या या कालावधीत दररोज १८ तास संवादिनी सराव वादन करण्यात आले. उपक्रमात ७ ते ७० या वयोगटातील ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**गझलसंमेलन**

रंगत संगत प्रतिष्ठान आणि करम प्रतिष्ठान यांच्या सहकार्यानं आज पिंपरीचिंचवडमध्ये राज्यस्तरीय गझल संमेलनाचे आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांच्या हस्ते सुधाकर कदम यांचा गझलमित्र पुरस्काराने सन्मान करण्यात आला. कवी सुरेश भटांच्या भेटीने आपली काव्यप्रतिभा फुलत गेल्याचं मनोगत कदम यांनी यावेळी व्यक्त केले.

**नीटसराव**

पुणे शहरात वैद्यकीय प्रवेशासाठी आवश्यक नीट परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि डॉ. अभंग प्रभू मेडिकल अकॅडमी यांच्या सहकार्याने विनामूल्य सराव परीक्षा आणि मार्गदर्शन उपक्रम राबवण्यात येत असल्याची माहिती संस्थेच्या संचालिका डॉक्टर हिमानी तपस्वी यांनी दिली आहे. येत्या १३ एप्रिलपासून नोंदणी करता येणार आहे. त्यासाठी www.apma.co.in संकेतस्थळावर नोंदणी करावी आणि या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही मोहोळ यांनी केलं आहे.

**भाजीबाजार**

गुलटेकडी इथल्या बाजार समितीच्या आवारात राज्यासह शेजारील राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांनी आवक झाली. घेवड्यातील दरवाढ वगळता सर्व फळभाज्यांचे भाव स्थिर आहेत. उन्हामुळे

काढणीत घट झाल्याने  पालेभाज्यांच्या भावात वाढ झाली. फळ बाजारात वाढत्या मागणीमुळे संत्र्याचे भाव वाढले आहेत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभुमीवर आज फुलांच्या मागणीत वाढ झाल्यानं पारंपारिक फुलांसह शोभिवंत फुलांचे भाव वधारले आहेत.

**<u>आंतरजिल्हाफुटबॉल</u>**

वेस्टर्न इंडिया फुटबॉल संघटनेच्या वतीनं वीस वर्षाखालील मुलांच्या राज्य आंतर जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा पुण्यात सुरू आहेत. यामध्ये पुणे जिल्हा संघानं दुसऱ्या फेरीत ठाणे संघावर १-० अशी मात करत सलग दुसरा विजय नोंदवला. पुण्याच्या अरहेव जोधवानी याने सामन्यातला एकमेव गोल केला.

**<u>हवामान</u>**

पुण्यात आज दिवसभर आकाश निरभ्र राहिलं तर दुपारनंतर वातावरण अंशतः ढगाळ होतं. कमाल तापमान ३८ अंश तर किमान तापमान २१ पूर्णांक ४ अंश सेल्सिअस नोंदलं गेलं. उद्याही संध्याकाळनंतर आकाश ढगाळ राहाण्याची शक्यता हवामान विभागानं नोंदवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**